7271/5



# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे

## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजाला, पुणे -४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई -: मेल आयडी-sceapune@gmail.com


जा.क्र. रासनिप्रा/अभिलेख धारिका क्र. १/निवडणूक चिन्ह मार्गदर्शक सुचना/ 821/२०१७ दिनांक २०.९.२०१७. 22/9/2017

-:परिपत्रक:-

**विषय :- सहकारी संस्थांची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणी (चिन्ह) वाटप करतांना अनुसरावयाच्या कार्यपध्दती बाबत...**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम २८ (३) मधील तरतुदीनुसार सहकारी संस्थांच्या व्यवस्थापक समितीची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणी (चिन्ह) वाटप करण्यात येते आणि, सदर बाबतीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचा निर्णय अंतीम असणे बाबत तरतुद आहे.

चिन्ह वाटप करतांना अनेक वेळा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी याबाबत निर्णय घेतल्यानंतर वादाचे प्रसंग उदभवतात. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चा नियम ३ (पाच) मध्ये निवडणूक सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी, अधिनियम व नियमांशी सुसंगत विशेष किंवा सर्वसाधारण आदेश किंवा निदेश देण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त झालेले आहेत. त्या अधिकारांचा वापर करुन असे वादाचे प्रसंग उदभवू नयेत यासाठी सदर परिपत्रकान्वये खालील प्रमाणे मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

१. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवाराने सादर केलेल्या नामनिर्देशन पत्रावर नामनिर्देशनपत्र सादर केल्याची अचूक वेळ नोंदवावी. एकापेक्षा अधिक नामनिर्देशन पत्रावर एकच वेळ नोंदवीण्यात येणार नाही याची खात्री करावी.
२. नियम २८ (३) (ब) मधील तरतुदीनुसार निवडणूक लढविणाऱ्या एकाहुन अधिक उमेदवारांनी एकाच निशाणीची (चिन्हाची) मागणी केली असल्यास प्रथम आलेल्याला प्रथम प्राधान्य या तत्वाचे काटेकोरपणे अनुपालन करुन निशाणी वाटप करावे. सदर बाबीचा निर्णय देतांना नामनिर्देशन पत्रावर नोंदवेलेली वेळ व तारीख आधारभूत असेल याची खात्री करावी.
३. नियम २८ (३) (क) मध्ये निवडून दयावयाच्या एकुण जागांच्या ३० टक्क्यापेक्षा अधिक उमेदवारांनी गट (पॅनल) तयार करुन सर्व संबंधीत उमेदवारांनी सहया केलेल्या लेखी सामुहीक अर्जाद्वारे एकाच निशाणीची मागणी करण्याची व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अशा गटास सामाईक निशाणी देण्याची तरतुद आहे. त्यामुळे गट (पॅनल) निर्माण केल्या बाबत सर्व संबंधीत उमेदवारांच्या स्वाक्षरीनिशी अर्ज प्राप्त झाल्यास अशा अर्जावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अचुक वेळ व तारीख नोंदवावी.
४. उपरोक्त प्रमाणे गट (पॅनल) निर्मीती बाबत प्राप्त झालेल्या अर्जांना अनुसरुन चिन्ह वाटप करतांना प्रथम आलेल्याला प्रथम प्राधान्य या तत्वाचे काटेकोरपणे अनुपालन करुन निशाणी वाटप करावे. सदर बाबीचा निर्णय देतांना गट (पॅनल) अर्जावर नोंदवेलेली वेळ व तारीख आधारभूत असेल याची खात्री करावी.
५. ज्या प्रसंगी गट (पॅनल) मध्ये समाविष्ट झालेल्या उमेदवारा व्यतिरीक्त कोणत्याही गटात समाविष्ट न झालेले स्वतंत्र उमेदवार शिल्लक असल्यास निशाणी (चिन्ह) वाटप करतांना उपरोक्त् सर्व सुचनांचे अनुपालन करुन गटांचे (पॅनलचे) निशाणी वाटप प्रथम पुर्ण करावे व त्यानंतर स्वतंत्र उमेदवारांना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वास अनुसरून उपलब्ध चिन्हांचे वाटप करावे.

सदर परिपत्रकातील सुचना संबंधीत जिल्हा/प्रभाग/तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणुन देऊन सदर सुचनांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांचे आदेशाने.**

22/9/17

(यशवंत गिरी),
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत,**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).
२. तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व).